**माजी सैनिक असलेल्या भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांना महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १६ (अ) खालील प्रयोजनांसाठी ना-परतावा रक्कम मंजूर करतांना त्यांच्या लष्करी सेवा विचारात घेण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:-भनिनि-१००४/ प्र क्र ४९/०४ /१३अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- १८|८|२००५

**शासन निर्णय :-**

राज्य शासनांतर्गत शासकीय कार्यालयात सेवेत असलेले माजी सैनिक, भविष्य निर्वाह निधीचे वर्गणीदार असल्याने त्यांनी एका निवेदनाद्वारे माजी सैनिक असलेल्या शासकीय कर्मचा-यांच्या भ.नि.नि. वर्गणीमधून त्यांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १६ (अ )अन्वये ना- परतावा रक्कम मंजूर करतेवेळी शासकीय सेवेचा कालावधी ठरवितांना त्यांची लष्करी सेवा विचारात घेण्याची विनंती केली आहे. सदरहू नियमातील तरतूदीन्वये वर्गणीदारास २० वर्षाची सेवा पूर्ण झाल्यावरच या नियमाखालील प्रयोजनांकरीता ना-परतावा रक्कम मंजूर करता येते. माजी सैनिक हे लष्करी सेवेत सुमारे १५ वर्षांची सेवा पूर्ण करुन विहित माध्यमाद्वारे राज्य शासनाच्या सेवेत नियुक्त होतात. तोपर्यन्त त्यांची मुलेही प्राथमिक शिक्षण पूर्ण करुन उच्च शिक्षणासाठी पात्र ठरलेली असतात, तसेच उक्त नियमातील तरतूदीनुसार राज्य शासनाच्या सेवेतील २० वर्षाची सेवा पूर्ण होईपर्यन्त काही माजी सैनिक वर्गणीदारांच्या बाबतीत ते नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तही होतात. या परिस्थितीत माजी सैनिकांकडून महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १६(अ) खालील प्रयोजनांसाठी त्यांची सैनिकी सेवा विचारात घेण्यात यावी, अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. यास अनुलक्षून माजी सैनिक असलेल्या भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांना महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १६ (अ) खालील प्रयोजनांसाठी निधीमधून रक्कम काढतांना त्यांची सैनिकी सेवा विचारात घेण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन आता असे आदेश देत आहे की, माजी सैनिक असलेल्या सर्व भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांना महाराष्ट्र सर्वसाधारण

भविष्य निर्वाह निधी नियम १६( अ) खालील प्रयोजनांसाठी त्यांच्या जमा निधीमधून रक्कम काढण्यास मंजुरी देतांना २० वर्षाच्या सेवेच्या अटीची पूर्तता होण्यासंदर्भात त्यांची शासकीय सेवेत येण्यापूर्वीची लष्करी सेवा विचारात घेण्यात यावी.

२. सदरचा शासन निर्णय, महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम ३४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींच्या अधीन राहून तसेच वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्र.११६/२००५ / सेवा-९ दि. ५/४/०५ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

३. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियमामध्ये वरीलप्रमाणे सुधारणा करण्याकरीता भविष्य निर्वाह निधी नियम १६ (अ) खाली टीप अंतर्भूत करण्याबाबतची अधिसूचना यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( दि.बा.दळवी.)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उपमुख्य मंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-१ , महाराष्ट्र, मुंबई (१० जादा प्रतीसह ),
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-२ , महाराष्ट्र, नागपूर (१० जादा प्रतीसह ),
महालेखापाल ( लेखा परीक्षा)-१ , महाराष्ट्र, मुंबई (१० जादा प्रतीसह ),
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ , महाराष्ट्र नागपूर( १० जादा प्रतीसह ),
* प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, राज्य निवडणुक आयोग, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्यायशाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
भारतीय लेखा परीक्षा आणि लेखा विभाग, महालेखापाल( लेखा व अनुज्ञेयता )-१, महाराष्ट्र,यांचे कार्यालय,भविष्य निर्वाह निधी शाखा जुनी.सी.जी.ओ. बिल्डींग, न्यू मरीन लाईन्स, १०१ महर्षि कर्वे रोड, मुंबई-४०० ०२० (५० जादा प्रतींसह)
मुख्य लेखा परीक्षक, निवासी लेखे, कोकण भवन, नवी मुंबई,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
ग्रामविकास विभाग/ नगर विकास विभाग/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
मंत्रालय मध्यवर्ती ग्रंथालय, मंत्रालय, मुंबई ( २ प्रती ),
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.
* **पत्राने.**

---------

एच–1047(5000–8–05)–2.